कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) अंतर्गत ऊस व मका या पिकांचा समावेश करण्यास मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः किरोनी-१४१८/ प्र.क्र.५५/४अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २६ फेब्रुवारी, २०१९

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. किरोनी-१४१८/ प्र.क्र.५५/४अे, दिनांक १९.०५.२०१८
२) आयुक्त (कृषी) यांचे पत्र जा. क्र./विप्र-७/क्रॉपसॅप १७-१८/प्र.क्र.२ / ८५१/१८, दि.१३.११.२०१८

<u>प्रस्तावना</u>

राज्यातील सोयाबीन, कापूस, भात, तूर व हरभरा या प्रमुख कृषि पिकांवरील कीड रोगांच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने सन २००९-१० ते २०१२-१३ दरम्यान राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून तर सन २०१३-१४ पासून नियमित राज्य योजनेतून पिकांवरील कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) राज्यात राबविण्यात येत आहे.

राज्यात सध्या ऊस पिकावर हुमणी व मका पिकावर अमेरीकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव आढळून आलेला आहे. या किडींमुळे ऊस व मका पिकांचे अनुक्रमे १,१७,५१२ व ५,१३९ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले असून त्यावरील योजना करण्यात येत आहे.अमेरिकन लष्करी अळी या नवीन किडीचा मका पिकासह ज्वारी व ऊस पिकांवरही प्रादुर्भाव होत आहे.

हुमणी व अमेरिकन लष्करी अळी या किडीच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने कृषी विद्यापीठे, पीक संशोधन संस्था, साखर कारखाने यांच्यासह बैठका घेण्यात आलेल्या असुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि, हुमणी व अमेरिकन लष्करी अळी या दोन्ही किडी बहुभक्षी प्रकारच्या असल्याने इतर पिकांचेही नुकसान होण्याची शक्यता असल्याचे सदर बैठकीमध्ये शास्त्रज्ञांनी निदर्शनास आणून दिलेले आहे. सद्य:स्थितीत जनजागृती करण्यात येत आहे.

कीडरोग नियंत्रणाकरिता राज्यात सध्या राबविण्यात असलेल्या क्रॉपसॅप व हॉर्टसॅप प्रकल्पांसाठी रुपये ४१४७.०८ लक्ष निधीच्या वार्षिक कृती आराखड्यास दि.१९.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली असुन, त्यापैकी आतापर्यंत रु.२७४७.०८ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर प्रकल्पामध्ये आपत्कालीन परिस्थितीत कीड नियंत्रणाकरिता मंजूर असलेल्या रु.८०२.५० लक्ष निधीतून हुमणी व अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणाकरिता मंजूर रु.८०२.५० लक्ष निधी तसेच क्रॉपसॅप व हॉर्टसॅप प्रकल्पातील अन्य बाबीवरील बचतीमधून हुमणी व अमेरीकन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी वापरण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

१. किडरोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) अंतर्गत ऊस व मका पिकावरील किडरोग नियंत्रणाचा समावेश करण्यास व कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) योजनेंतर्गत ऊस पिकावर हुमणी व मका पिकावर अमेरीकन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी, सदर प्रकल्पामध्ये आपत्कालीन परिस्थितीत कीड नियंत्रणाकरिता मंजूर असलेल्या रु.८०२.५० लक्ष निधीतून, हुमणी व अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणाकरिता रु.८०२.५० लक्ष निधी तसेच क्रॉपसॅप व हॉर्टसॅप प्रकल्पातील अन्य बाबीवरील बचतीमधून हुमणी व अमेरीकन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. या योजनेची अंमलबजावणी संदर्भाकित दिनांक १९ मे, २०१८ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनानुसार करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२६१२३८२८०२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Dr.Kiran Patil
Date: 2019.02.26 12:40:16 +05'30'

(डॉ.किरण पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्य मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
९) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.
११) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१२) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१३) सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
१४) महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
१५) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१८) सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
१९) वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प - १३), मंत्रालय, मुंबई
२०) निवड नस्ती ४-अे.